हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
21km
Associate Sponsor RISO
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

औरंगाबाद महामॅरेथॉन आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे या दिवसासाठी पूर्ण तयारी करा. आरोग्यावर लक्ष केंद्रित करा आणि आत्मविश्वासपूर्वक उपक्रमात सहभागी व्हा. 'फिटनेस' विषयक जनजागृती करणारा हा उपक्रम आहे. आपल्या शहरासाठी आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाला दिवसेंदिवस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

- अशोक देशपांडे

प्राइड, जयलक्ष्मी कास्टिंग, औरंगाबाद अलॉइज ग्रुप... (डावीकडून उभे) संजय बेंडसरे, चंद्रशेखर तानपुरे, शिवकुमार सुरकुटलावार, अविनाश चिंचोलीकर, विजय डोंगरे, आदित्य विधाते, प्रकाश माताडे, हनुमानप्रसाद बगडिया, श्याम अग्रवाल, भागवत काळे, नवीन बगडिया, नितीन बगडिया, संजय अग्रवाल, सौरभ गुप्ता, पंकज अग्रवाल, अजय अग्रवाल, लक्ष अग्रवाल, शारदादेवी अग्रवाल, श्रद्धा अग्रवाल, चेतन गुप्ता. (डावीकडून बसलेले) योगेश कसबे, रामेश्वर पवार, रावसाहेब राक्ताते, भूषण कुलकर्णी, मधुकर राशीनकर, दत्ता वाघमारे, विजय झाल्टे, रवी कुचे, नानासाहेब पैठणे, ज्ञानेश्वर चौधरी, हर्षल जोशी, संजय शेळके, राकेश ब्राह्मणकर, राजू सिंग, धनंजय सिंग.

कुटुंबासह सहभागी व्हा

पूर्वी पुणे-मुंबई यासारख्या शहरात मॅरेथॉन आयोजित व्हायचे; पण आता 'लोकमत'च्या पुढाकाराने आपल्याकडे औरंगाबाद महामॅरेथॉन हा उपक्रम आयोजित करण्यात येत आहे, ही अतिशय चांगली गोष्ट आहे. औरंगाबादकरांनो आपल्यासाठी आणि आपल्या शहरासाठी आयोजित या उपक्रमाला भरभरुन प्रतिसाद द्या. संपूर्ण कुटुंबासह महामॅरेथॉनमध्ये सहभागी व्हा.

- परवेझ विरानी

नॅशनल इंग्लिश स्कूल... (डावीकडून) वैशाली जाधव, वैशाली जैस्वाल, शेख सबा, रश्मी पांडे, सुप्रिया शेळके, कल्याणी जिवडे, जयश्री वानखेडे, नितीन सोनोने.

धारेश्वर शिक्षण संस्था... (डावीकडून) शोभा वाठोरे, अनुपमा पाटील, रिना पाटील (संचालिका), आर्यन पाटील, मनीषा पाटील, ममता पवार, प्रदीप तेजनकर, अशोक सपाटे, गंगाधर जंजाळ, (मागील रांगेत डावीकडून) दिलीप गायकवाड, राजेंद्र सोळुंके, राहुल खरात, नरेंद्र सपकाळ, एकनाथ ढोमसे, संतोष जाधव.

जैन इंजिनिअर्स सोसायटी... (डावीकडून) अस्मिता पहाडे, सपना चुडीवाल, प्रिया ठोले, सानिका जैन, नीता खंदारे, वंदना पाटणी, सरोज मिश्रीकोटकर, आरती बोहरा, रश्मी गांधी, सृष्टी मिश्रीकोटकर.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिंगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

ग्रामीण भागात वेचला जास्तीचा प्लास्टिक कचरा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : शासकीय कर्मचाऱ्यांनी २७ नोव्हेंबर रोजी विभागात प्लास्टिक कचरा संकलन मोहीम राबविली. या मोहिमेत ग्रामीण भागात ५८ हजार ५४७ किलोग्रॅम कचरा संकलित करण्यात आला आहे. तर शहरी भागामध्ये १४ हजार १७५ किलोग्रॅम कचऱ्याचे संकलन झाले. विभागात ७२ हजार ७२३ किलोग्रॅम कचरा संकलन झाल्याची आकडेवारी विभागीय प्रशासनाने प्रसिद्धीस दिली आहे.

२५ व २६ नोव्हेंबर रोजी शासकीय सुटी असल्यामुळे या मोहिमेला प्रतिसाद मिळाला नाही. ७ डिसेंबर रोजी पूर्ण मराठवाड्यात ही मोहीम व्यापक स्वरुपात राबविण्यात येणार आहे. त्याची तयारी सुरु झाली असून, विभागीय आयुक्तांनी पूर्ण विभागाला सूचना केल्या आहेत.

६ हजार ६४२ ग्रामपंचायती आणि ७५ नगरपालिका हद्दीमध्ये ही मोहीम राबविण्यात आली. नांदेडमध्ये सर्वाधिक २५ हजार ४९१ किलोग्रॅम कचरा संकलित झाला तर त्याखालोखाल १० हजार २८६ किलोग्रॅम कचरा सरकारी कर्मचाऱ्यांनी वेचला आहे.

जिल्हा	ग्रामपंचायत	नगर परिषद	संकलित कचरा
औरंगाबाद	८६३	८	१०२८६
बीड	१०२३	११	८३३८
हिंगोली	५६३	५	७८२१
जालना	७७५	८	४१७३
लातूर	७८३	९	३९९२
नांदेड	१३०९	१६	२५४९१
उस्मानाबाद	६२२	१०	८७४१
परभणी	७०४	८	३८७९
एकूण	७७४२	७५	७२७२३

विद्यापीठ अधिसभा निवडणूक : ५८ उमेदवारांचे भविष्य मतपेटीत बंद; ७ डिसेंबर रोजी होणार मतमोजणी

प्रशासनाच्या तयारीमुळे पदवीधरांचे मतदान सुरळीत

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिसभेच्या पदवीधर गटातील १० जागांसाठी चार जिल्ह्यांतील ५६ केंद्रांवरील ८४ बुथवर सोमवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान झाले. पहिल्या टप्प्यातील अनुभवामुळे या टप्प्यात विशेष खबरदारी घेण्यात आली होती. यामुळे एकाही केंद्रावर अनुचित प्रकार घडला नसल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. साधना पांडे यांनी सांगितले.

विद्यापीठातील अधिसभेतील पदवीधर गटासाठी सोमवारी मतदान झाले. यात एकूण २९ हजार ५०० मतदार मतदानासाठी पात्र ठरले होते. तर खुल्या प्रवर्गातील ५ आणि राखीव प्रवर्गातील ५ जागांसाठी तब्बल ५८ उमेदवार रिंगणात होते. यात सर्वाधिक उमेदवारांची गर्दी खुल्या प्रवर्गात होती. ५ जागांसाठी तब्बल ३३ उमेदवारांनी आपले नशीब अजमावले आहे. याशिवाय अनुसूचित जाती गटातील एका जागेसाठीही ९ उमेदवारांमध्ये लढत झाली. यामध्ये प्रा. सुनील मगरे आणि पंकज भारसाखळे यांच्यात थेट सामना झाला. तर प्रकाश इंगळे, प्रशांत पवार, ॲड. शिरीष कांबळे आणि डॉ. बाबासाहेब भालेराव यांनीही चांगलीच टक्कर दिलेली आहे. मागील टप्प्यात झालेल्या मतदानाच्या वेळी उस्मानाबाद येथील विद्यापीठ उपपरिसरातील मतदारांच्या मतपत्रिका दुपारनंतर पोहोचल्या होत्या. याशिवाय अनेक मतदान केंद्रांवर अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांमुळेही गोंधळ उडाल्याचे पाहायला मिळाले. मात्र यानंतर पदवीधरांच्या वेळी विद्यापीठ प्रशासनाने गंभीरपणे नियोजन करून सर्व घटकांचे सहकार्य घेऊन निवडणूक सुरळीतपणे पार पाडली. यात प्रत्येक मतदान केंद्रांवर केंद्रप्रमुख म्हणून प्राध्यापक, वर्ग-१ चे अधिकारी दिले. तसेच इतर कामांसाठीही पाच कर्मचारी प्रत्येक बुथसाठी दिले होते. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यासाठी निवडणूक निरीक्षक, सीसीटीव्हीची सक्षम यंत्रणा, कर्मचाऱ्यांच्या राहण्याची व जेवण्याची चोख व्यवस्था केली होती. या सर्व बाबींवर निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. साधना पांडे यांचे बारकाईने लक्ष होते. कोणत्याही केंद्रातून तक्रार आली तर त्याची तात्काळ दखल घेण्यात येत होती. दिवसभर एकाही मतदान केंद्रावर गडबड झाली नसल्याचे डॉ. पांडे यांनी स्पष्ट केले.

७ डिसेंबर रोजी मतमोजणी

पदवीधर अधिसभेतील झालेल्या मतदानाची मतमोजणी गुरुवारी सकाळी १० वाजेपासून होईल. मागील वेळी झालेला गोंधळ टाळण्यासाठी यावेळी २५ टेबल लावण्यात येणार असल्याचेही डॉ.पांडे यांनी सांगितले. मतमोजणीत गोंधळ होऊ नये, पुरेशा जागा उपलब्ध असावी, यासाठी मतमोजणी क्रीडा विभागाच्या सभागृहात होणार आहे.

१६ हजारांपेक्षा अधिक झाले मतदान

जिल्हा	झालेले मतदान	एकूण मतदान	टक्केवारी
औरंगाबाद	७,५४८	१४,९३६	५०.५५
जालना	२,०६४	३,२२९	६३.९२
बीड	५,३६५	७,९०५	६७.८७
उस्मानाबाद	१,९०८	२,९४१	६४.८८
एकूण	१६,८८५	२९,०११	५८.२१

'मुद्रा योजनेचा अहवाल सादर करा'

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : मुद्रा बँक योजनेच्या अंमलबजावणीत बँकांची भूमिका महत्त्वाची आहे. जिल्ह्यातील सर्व बँकांकडून शाखानिहाय मुद्रा बँक योजना उद्दिष्टपूर्तीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने सोमवारी घेतलेल्या बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात योजना समन्वय समितीची चौथी बैठक झाली. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विश्वंभर गावंडे, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रदीप कुठवाल, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक एन. एन. मोरे, शेख मुतूर्झा अहमद, नियोजन अधिकारी विजय पवार, आर. डी. देशपांडे, बी.आर. रिठे, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत उपस्थित होते.

अग्रणी बँकेने जिल्ह्यातील बँकांकडून शाखानिहाय योजनेतील शिशू, किशोर, तरुण वर्गात प्राप्त अर्ज, मंजूर अर्ज आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागवून तो पुढील बैठकीत सादर करावा. नियोजन विभागाने योजनेसाठी आवश्यक निधी व इतर बाबींचा शासनस्तरावर पाठपुरावा करावा. योजनेचा व्यापक प्रसार प्रचारासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अग्रणी बँक आणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्यासह जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्र यांनी परस्पर समन्वयातून जागृती मेळाव्यांचे आयोजन करण्याच्या सूचना बैठकीत करण्यात आल्या.

प्रदीप पाटील

सोनाली गावडे

'शिवार'चे वाङ्मय पुरस्कार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित अशा वाङ्मयकृतीला पुरस्कार देण्यात येतो. या उपक्रमांतर्गत यंदाचा शेतकरी साहित्य पुरस्कार नांदेड जिल्ह्यातील प्रदीप धोंडिबा पाटील यांच्या 'गावकळा' या कादंबरीला जाहीर करण्यात आला.

तसेच संस्थेतर्फे १६ वर्षांखालील मुला-मुलींच्या साहित्याला दिला जाणारा संदीप दळवी बाल साहित्य पुरस्कार सोलापूर येथील सांगोला तालुक्यातील सोनाली गावडे या विद्यार्थिनीने लिहिलेल्या 'माझी दैनंदिनी' या पुस्तकाला दिला जात आहे. लवकरच एका कार्यक्रमाच्या माध्यमातून हे पुरस्कार प्रदान केले जातील, अशी माहिती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रेरणा दळवी, सचिव डॉ. नीळकंठ डाके यांनी दिली.

भाग्यश्री योजना : योग्य मार्गाने जागृती होण्याची गरज

राज्यस्तरीय मेळावा घेऊनही प्रतिसाद शून्यच

ऋचिका पालोदकर | लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या वाढावी, त्यांना सन्मान मिळावा, उत्तम शिक्षण मिळावे आणि यामुळे सामाजिक स्वास्थ्य चांगले राहावे, यासाठी महिला व बालविकास विभागातर्फे माझी कन्या भाग्यश्री योजना सुरु करण्यात आली आहे. नुकतेच या योजनेच्या प्रचारासाठी लाखो रुपये खर्चून महाराष्ट्रभर राज्यस्तरीय मेळावे घेण्यात आले; पण तरीही मिळालेल्या तुटपुंज्या प्रतिसादावरून मेळावा उपयोग शून्य ठरल्याचे चित्र सध्यातरी दिसते आहे.

एप्रिल २०१६ मध्ये पूर्वी सुरु असलेल्या 'सुकन्या' योजनेत काही बदल करण्यात आले आणि ती माझी कन्या भाग्यश्री म्हणून ओळखली जाऊ लागली. १ लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या गटासाठी ही योजना होती. यामध्ये पहिल्या किंवा दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर पालकांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास मुलींच्या नावे ठराविक रक्कम ठेवली जाणार होती. या योजनेला मिळालेला अत्यल्प प्रतिसाद पाहून योजनेत पुन्हा एकदा बदल करण्यात आले. मूळ योजनेतील काही किचकट अटी काढून टाकण्यात आल्या आणि ऑगस्ट २०१७ पासून वार्षिक उत्पन्न ७ लाख ५० हजार आणि त्यापेक्षा कमी असणाऱ्या सर्वांचा या योजनेत समावेश करण्यात आला.

तरीही योजनेच्या प्रतिसादात फारसा फरक न पडल्याने योजनेच्या प्रचार आणि प्रसारासाठी नोव्हेंबर महिन्यात लाखो रुपये खर्चून महाराष्ट्रात ठिकठिकाणी राज्यस्तरीय मेळावे घेण्यात आले. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी अशा सर्वांना या योजनेत सहभागी करुन सांस्कृतिक माध्यमातून प्रबोधन करण्यात आले होते.

ऑगस्ट-१७ नंतर जन्मलेल्या मुलींसाठी लागू

- या विभागातील अधिकाऱ्यांच्या मते अंगणवाडीसेविका त्यांच्या विभागात सर्वत्र परिचित असल्यामुळे त्यांना या योजनेविषयी लोकांचे समुपदेशन करायचे तंत्र शिकवून त्यामार्फत योजनेचा प्रचार करण्याची गरज आहे. ज्यांना एक किंवा दोन मुली आहेत आणि त्यानंतर तिसरे अपत्य होऊ न देण्याचा ज्यांनी निर्णय घेतला आहे, अशा सर्वांसाठीच ही योजना आहे.
- शासनाचे लोक आपल्यापर्यंत पोहोचत नसतील तर इच्छुक व्यक्ती स्वत: पुढाकार घेऊन जिल्हा परिषदेचा महिला व बालकल्याण विभाग किंवा तालुकास्तरावर एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी संपर्क साधून योजनेचा लाभ घेऊ शकतात. १ ऑगस्ट २०१७ नंतर जन्मलेल्या मुलींसाठी योजना लागू आहे.

कार्यशाळा... शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (घाटी) नेत्र विभाग आणि औरंगाबाद नेत्रतज्ज्ञ संघटना यांच्या वतीने आयोजित कार्यशाळेत दीप प्रज्वलन करताना अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर. याप्रसंगी डॉ. क्रिष्ण प्रसाद, डॉ. शशी कपूर, डॉ. वर्षा नांदेडकर आदी.

नेत्र शस्त्रक्रियेने मानवी जीवन सुंदर

क्रिष्ण प्रसाद : नेत्र तज्ज्ञांच्या परिषदेत मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आधुनिक तंत्रज्ञानामुळे डोळ्यांवरील अवघड अशा शस्त्रक्रिया अगदी सोप्या झाल्या आहेत. चष्मा काढणे, मोतीबिंदू तसेच काचबिंदू, अशा शस्त्रक्रियांनी मानवी जीवन सुंदर केले आहे, असे प्रतिपादन हुबळीचे नेत्रतज्ज्ञ डॉ. क्रिष्ण प्रसाद यांनी केले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (घाटी) नेत्र विभाग आणि औरंगाबाद नेत्रतज्ज्ञ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी पार पडलेल्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. घाटीच्या अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी मुंबईचे नेत्रतज्ज्ञ डॉ. शशी कपूर, नेत्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नांदेडकर यांची उपस्थिती होती.

डॉ. प्रसाद म्हणाले, आज तंत्रज्ञानाने खूप प्रगती केली आहे. परंतु या तंत्रज्ञानाला आपल्या अनुभवाची जोड दिली पाहिजे. याचा सगळा फायदा रुग्णांना होईल. डोळे अतिशय नाजूक भाग आहे. यामध्ये किंचितशी चूकसुद्धा रुग्णाचे आयुष्य उद्ध्वस्त करु शकते. व्यक्तीचा चष्मा घालविणाऱ्या शस्त्रक्रियांनी डोळ्यांच्या उपचारांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला आहे, असे ते म्हणाले.

यावेळी डॉ. शशी कपूर यांनीही विविध शस्त्रक्रियांविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत शहरातील १२० तज्ज्ञांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळा यशस्वीतेसाठी डॉ. सुनयना मलिक, डॉ. राजू मुंदडा व डॉ. धनंजय मावरे यांनी विशेष प्रयत्न केले.

ईपीएस-९५ पेन्शनधारकांचा गुरुवारी दिल्लीत धडक मोर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आपल्या विविध मागण्यांकडे केंद्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. रामलीला मैदान ते संसद भवन, दिल्ली असा धडक मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चात सहभागी होण्यासाठी अनेक जण दिल्लीकडे रवाना झाले. यात ॲड. सुभाष देवकर, जी. व्ही. गाडेकर, दीपक देशपांडे, सांडू मन्सुरी, शेख शफी, व्ही. आर. चव्हाण, आर. टी. कळसकर, बळीराम पाठे, अरुण देवकर, नाना निंबाळकर, उत्तम गायकवाड, उत्तम गावंडे, ॲड. कृष्णा जाधव, लालमिया शहा, विजय तायडे, माधुरी जोशी, शारदा देवकर, जयश्री पहाडे, दीपक देशपांडे, भागवत वारभुवन, डी. एम. पाटील आदींचा समावेश आहे. महागाई भत्त्यासह दहमहा पेन्शन ७ हजार ५०० रु. करण्यात यावी, कोशियारी समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करा, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार पूर्ण पगारावर पेन्शन मंजूर करण्यात यावी, पेन्शनधारकांना पती-पत्नीसह मोफत वैद्यकीय सुविधा मंजूर करण्यात याव्यात, आदी मागण्या यानिमित्ताने करण्यात आल्या आहेत.

'इजलासे बाबरी' आज कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : मुस्लिम नुमाईंदा कौन्सिलतर्फे 'इजलासे बाबरी'या विषयावर ५ डिसेंबर रोजी रात्री ७.३० वाजता नेहरु भवन येथे एका कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार

सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ,कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

जहागीरदार यांना पीएच. डी.

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने व्यवस्थापनशास्त्र विषयात खाजा सर्फराज जहागीरदार यांना पीएच. डी. प्रदान केली. डॉ. व्ही. एस. इप्पर यांच्या मार्गदर्शनाखाली 'क्रिटिकल ॲनालिसिस ऑफ कन्झ्युमर बिहेव्हिएर टुवर्डस् सेल्युलर हॅण्डसेट ॲण्ड देअर सर्व्हिसेस इन मराठवाडा ॲण्ड खान्देश रिजन' हा प्रबंध सादर केला.

गुणवंत कामगार पुरस्कार अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार आणि कामगारभूषण पुरस्कार -२०१७ साठी अर्ज सादर करण्यास १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत होती. कामगारांच्या मागणीनुसार ही मुदतवाढ करण्यात आली असल्याचे कळविण्यात आले आहे. मंडळाच्या राज्यभरातील सर्व कामगार कल्याण केंद्रांमध्ये अर्ज उपलब्ध आहेत.

गुणवंत कामगार पुरस्काराचे स्वरुप १५ हजार रु, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे असून, कामगारभूषण पुरस्काराचे स्वरुप २५ हजार रु, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत कामगार कल्याण निधी भरणारे विविध उद्योग, कंपन्या, कारखाने, दुकाने, हॉटेल्स, बँका आदी आस्थापनातील कामगार या पुरस्कारांसाठी अर्ज करु शकतील. कामगारांनी आपापल्या आस्थापनेमार्फत अर्ज सादर करावयाचे आहेत.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521